**महाराष्ट्र शासन**
**वन विभाग**

# उपवनसंरक्षक, नागपूर वनविभाग, नागपूर यांचे कार्यालय,

(बी.एस.एन.एल., संचारलक्ष्मी बिल्डींग, कस्तूरचंद पार्क समोर, नागपूर-४४०००१, दुरध्वनी क्र. ०७१२ २५६५६२४, ईमेल-dycfnagpur@mahaforest.gov.in)

**विषय:-** वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत कार्यकारी अभियंता, महापारेषण, नागपूर यांना २२० KV कळमेश्वर ते २२० KV वरुड दरम्यान ट्रान्सामिशन लाईन टाकण्यासाठी नागपूर जिल्ह्यातील ६.०७६० हे. वनजमीन वळती करणेबाबत.

क्रमांक. कक्ष-११/वनसंवर्धन/प्र.क्र.४९२/ /२०२२-२३/ 1277 नागपूर, दिनांक 30/12/2022

प्रति,
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक),
नागपूर वनवृत्त.

संदर्भ :- १) महाराष्ट्र शासन पत्र क्र एफएलडी-२०२२/प्र.क्र.३०९/फ-१०, दिनांक ०७/१२/२०२२.
२) कार्यकारी अभियंता (प्रभारी), अउदा प्रकल्प विभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी, मर्यादीत, अमरावती यांचेकडील पत्र क्र. महापारेषण/काअ/अउदा/प्र.वि./अम/तांत्रिक, दिनांक १४/१२/२०२२.

उपरोक्त संदर्भिय पत्र क्र १ अन्वये Diversion of Forest land for use of non-forest purpose under forest conservation Act, १९८० for forestland involved towards construction of २२० KV Kalmeshwar-Warud Line चा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयास सादर करण्यात आला असता महाराष्ट्र शासन संदर्भिय पत्र क्र १ अन्वये १ ते ४ मुद्यांची माहिती शासनास तात्काळ उपलब्ध करून देणेबाबत कळविले आहे. त्याअनुषंगाने प्रकल्प यंत्रणेने त्यांचेकडील संदर्भिय पत्र क्र. २ अन्वये मुद्या क्र. १ ते ४ मुद्यांची माहिती या कार्यालयास सादर केलेली असुन सदर माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | मुद्दे | पूर्तता |
|---|---|---|
| १ | सदर प्रकल्प वन्यजीव भ्रमणमार्गात येत असल्यामुळे, सदर प्रकरणी वन्यजीव मंजूरीची आवश्यकता आहे किंवा कसे याबाबत प्रधान वनसंरक्षक वन्यजीव यांचेकडून अभिप्राय घेवुन त्याप्रमाणे माहिती सादर करावी. | सदर प्रस्ताव हा वन्यजीव भ्रमणमार्गात येत असल्याने सदर प्रकरणी वन्यजीव मंजूरीची आवश्यकता आहे. |
| २ | वनभंग झाला असल्यामुळे दंडनिय नक्त वर्तमान मुल्य भरण्यास प्रकल्प यंत्रणा तयार असल्याबाबत हमीपत्र सादर करावे. | वनभंग झाला असल्याने प्रकल्प यंत्रणेने दंडनिय नक्त वर्तमान मुल्य भरण्यास तयार असल्याबाबत हमीपत्र सादर केलेले आहे सोबत सहपत्रीत. |
| ३ | वनभंग केंद्रस्थ अधिकारी यांनी प्रकल्पासाठी प्रस्तावित केलेल्या वनक्षेत्राचा वैधानिक दर्जा राखीव वनक्षेत्र असा नमुद केला आहेए परंतू उपवनसंरक्षक, नागपूर यांनी त्यांच्या Part II प्रमाणपत्राध्ये वनक्षेत्राचा वैधानिक दर्जा झुडपी जंगल नमुद केले आहे. सबब, वनक्षेत्राचा वैधानिक दर्जा राखीव वनक्षेत्र आहे की झुडपी जंगल याबाबत खात्री करुन आवश्यक त्या दुरूस्तीसह प्रमाणपत्र ऑनलाईन व ऑफलाईन सादर करावे. | प्रस्तावित क्षेत्राचा वैधानिक दर्जा हा झुडपी जंगल असुन भारतीय वनअधिनियम 1927 चे कलम 4 अन्वये अधिसूचीत झालेला आहे. अधिसूचनेची प्रत संलग्न.<br>उपवनसंरक्षक, नागपूर यांनी त्यांच्या Part II प्रमाणपत्राध्ये वनक्षेत्राचा वैधानिक दर्जा हा झुडपी जंगल (Reserved Forest Section 4 Notified) असे नमुद केले असुन सुधारित Part II सोबत सहपत्रीत केले आहे. |
| ४ | पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित केलेल्या क्षेत्राचा 7/12 उतारा सादर करावा. | पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित केलेल्या क्षेत्राचा गट क्र. 328/3 चा 7/12 उतारा सादर केलेला आहे. |

सहपत्र:- वरिलप्रमाणे.

**(डॉ. भारत सिंह हाडा)**
**उपवनसंरक्षक (प्रादेशिक)**
O/c **नागपूर वनविभाग, नागपूर**

**प्रतिलिपी:-** अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, म.रा. नागपूर यांना माहितीस सविनय सादर.
**प्रतिलीपी:-** कार्यकारी अभियंता, ईएचव्ही प्रोजेक्ट डीवीजन एमएसईटीसीएल, प्रकाया सरिता, ए-विंग, तळमजला, प्रशासकिय बिल्डींग मोर्शी रोड, अमरावती यांना माहितीस अग्रेषित.